महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९९०० (?)
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- १४४२/गट-क संयुक्त- क.स/२०२१/२४ दिनांक :- १७ ऑगस्ट ,२०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

## महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१
## कर सहायक या संवर्गाचा अंतिम निकाल
## जाहिरात क्रमांक – २६९/२०२१ व ६०/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ०६ ऑगस्ट, २०२२ रोजी मुंबईसह औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक व पुणे व दिनांक २७ ऑगस्ट, २०२२ रोजी मुंबईसह औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक व पुणे जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ मधील कर सहायक गट-क या संवर्गाचा अंतिम निकाल दिनांक १७ ऑगस्ट ,२०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार कर सहायक गट-क **२२५** उमेदवारांची प्रस्तुत पदाकरिता शिफारस करण्यात येत आहे.

२.सदर परीक्षेमध्ये चंद्रपूर जिल्हयातील **श्री. जेंगठे राहूल विजय** (बैठक क्रमांक -NG००१०६०) हे राज्यातून व मागासवर्गवारीतून प्रथम आले आहेत. महिला वर्गवारीतून अहमदनगर जिल्हयातील **श्रीमती हाडके रिंकल अंकुश** (बैठक क्रमांक -PN००४०९१) ह्या प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut-off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत निकालानुसार मागास आरक्षित पदावर शिफारसपात्र उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्दयांसदर्भात तसेच अन्य मुद्दयासंदर्भात मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयांच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

७. प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

ठिकाण : नवी मुंबई

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई